दै. दिव्य मराठी २४/०

गुड न्यूज

## के. के. वाघच्या २२ विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूत तीन लाखांचे पॅकेज

**नाशिक** | के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये पुण्यातील फीन आयक्यू या कंपनीने २२ विद्यार्थ्यांची निवड केली असून, त्यांना वार्षिक तीन लाख रुपयांपर्यंतच्या पॅकेजची प्लेसमेंट मिळाली आहे. मॅकेनिकल, प्रॉडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल, कॉम्प्युटर, आयटी, इलेक्ट्रॉनिक्स शाखांतील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. टेक्निकल टेस्टमधून ६० विद्यार्थ्यांची टेक्निकल इंटरव्ह्यू व अंतिम मुलाखतीसाठी निवड झाली.

सविस्तर. पान ८

## करिअर- वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात विप्रो कंपनीतर्फे कॅम्पस इंटरव्ह्यू

**नाशिक** | के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात मंगळवारी होणाऱ्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये विप्रो कंपनी सहभागी होणार आहे. यात मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन(एमसीए)च्या विद्यार्थ्यांनी सकाळी ९.३० वाजेपर्यंत नोंदणी करावी. २०१५ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी यावेळी कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. शहाबादकर यांनी केले आहे.

दै. सकाळ 24/0

# 'एमसीए'च्या विद्यार्थ्यांसाठी आज कॅम्पस इंटरव्ह्यू

नाशिक, ता. २३ : विप्रो लिमिटेड कंपनीतर्फे क. का. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च येथे उद्या (ता. २४) कॅम्पस इंटरव्ह्यू होणार आहे. 'एमसीए'च्या विद्यार्थ्यांसाठी हा इंटरव्ह्यू असेल. नाशिक विभागातील एमसीए शिक्षणातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी केले आहे. निवड प्रक्रियेत सुरवातीला प्रवेश परीक्षा होईल. त्यानंतर एचआर विभागातर्फे मुलाखती घेतल्या जातील. याद्वारे एक लाख ८० हजार ते दोन लाख २० हजारांपर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळविण्याची संधी आहे. सकाळी साडेनऊला महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेल येथे उपस्थित राहावे.

# वाघ महाविद्यालयातील २२ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूत निवड

## नोकरीची संधी : 'फिन आयक्यू' कंपनीमार्फत पार पडली प्रक्रिया

सीएनएक्स प्रतिनिधी
cnx@lokmat.com

नाशिक, दि. २२ : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. 'फिन आयक्यू' या पुण्यातील कंपनीद्वारे घेतलेल्या या प्रक्रियेत महाविद्यालयातील २२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यात प्रत्येक विद्यार्थ्याला तीन लाख प्रतिवार्षिक पॅकेज देण्यात आले. महाविद्यालयातील सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत सहभागी होण्याची मुभा दिली होती. प्री-प्लेसमेंट चर्चेने या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली.

मेकॅनिकल, आयटी, प्रॉडक्शन, इलेक्ट्रीकल, कॉम्प्युटर, केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स यातील २०० विद्यार्थी कॅम्पस इंटरव्ह्यूत सहभागी झाले होते. त्यातील ६० विद्यार्थ्यांची निवड टेक्निकल व वैयक्तिक चाचणीसाठी करण्यात आली. यातून २२ विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना ऑफर लेटर देण्यात आले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी फिन आयक्यू कंपनीच्या मिलिंद कुलकर्णी यांचे आभार मानले.

यावेळी के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशीनाथ टर्ले, प्रा. के. एस. बंदी, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. पी. के. शहाबादकर आदि उपस्थित होते.



कॅम्पस इंटरव्ह्यूत निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. पी. के. शहाबादकर, फिन आयक्यू कंपनीचे मिलिंद कुलकर्णी आदि.

### या विद्यार्थ्यांची झाली निवड

शितल वाघ, प्राची नागदेव, अश्विनी पाटील, जय डेंगळे, दिव्या टाकवाले, अमोल पालवे, साईकुमार बालकृष्णन, सायली चौधरी, पूजा नलवाडे, चिंतन प्रजापती, वृषभ ओस्वाल, सोपान आव्हाड, मोरारबाजी बोडके, शगुन सेनार, प्रियंका अमृतकर, अमित जोशी, अभय पांडे, दत्तात्रय कानडे, खान अख्तर, फेबिन अनियन, अमृता डोलस.



कॅम्पस इंटरव्ह्यूत निवड झालेल्या विद्यार्थिनीला ऑफर लेटर देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. पी. के. शहाबादकर, फिन आयक्यू कंपनीचे मिलिंद कुलकर्णी आदि.

दै. लोकमत 23/03/15

# के. के. वाघच्या २२ विद्यार्थ्यांना पॅकेज ३ लाख

प्रतिनिधी | नाशिक

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. यात पुण्यातील फीन आयक्यू या कंपनीने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यात २२ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, त्यांना वार्षिक तीन लाख रुपयांपर्यंतच्या पॅकेजची प्लेसमेंट मिळाली आहे.



'फीन आयक्यू' या कंपनीने प्लेसमेंट दिलेल्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

## यांना मिळाली प्लेसमेंट...

शीतल वाघ, प्राची नागदेव, अश्विनी पटील, जय डेंगळे (आयटी), ज्योती शिरोळे, दिव्या ताकवाले, अमोल पालवे, साईकुमार बालकिष्ण (इलेक्ट्रिकल), सायली चौधरी, पूजा नलवडे, चिंतन प्रजापती, ऋषभ ओस्तवाल, सोपान आव्हाड, मोरारजी बोडके (मॅकेनिकल), शगुन तेंगर, प्रियंका अमृतकर, अमित जोशी (कॉम्प्युटर), अभय पांडे, दत्तात्रय कानडे (इलेक्ट्रॉनिक्स), अख्तर खान, अनियान फेबिन (केमिकल), अमृता डोळस (एमसीए) यांना प्लेसमेंट मिळाली.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात यापूर्वी घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये आतापर्यंत तब्बल २५० हून अधिक विद्यार्थ्यांना नामवंत कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळाल्या आहेत. नुकत्याच झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये मॅकेनिकल, प्रॉडक्शन, इलेक्ट्रिकल, केमिकल, कॉम्प्युटर, आयटी, इलेक्ट्रॉनिक्स शाखांतील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. टेक्निकल टेस्टमधून ६० विद्यार्थ्यांची टेक्निकल इंटरव्ह्यू व अंतिम मुलाखतीसाठी निवड झाली. कंपनीचे प्रमुख मिलिंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यात २२ विद्यार्थ्यांना वार्षिक तीन लाख रुपयांपर्यंतच्या पॅकेजची ऑफर मिळाली आहे. कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्लेसमेंट सेलप्रमुख डॉ. पी. शहाबादकर यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशीनाथ टर्ले, सचिव के. एस. बंदी यांचे मार्गदर्शन लाभले.

दै. दिव्य मराठी 27/03/2015

# नऊ विद्यार्थिनींना विप्रोने दिली संधी

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यूत एमसीएच्या ९ जणांना प्लेसमेंट मिळाली. विप्रो कंपनीने ९ जणांना वार्षिक २.२५ लाख रुपयांच्या पॅकेज दिले. प्राचार्य डॉ. नांदूरकर व प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शहाबादकर यांच्या मार्गदर्शनाखाली विप्रो टेक्नॉलॉजीचे संजीव बेटदूर यांनी मुलाखती घेतल्या. मयुरी नंदन, सुनील भाले, राणी तिवारी, आश्लेषा यादव, वृषाली नागमोती, राहुल पवार, प्रतिभा बिडवे, इमिला फर्नांडिस, विशाखा गांगुर्डे या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाली आहे.

दै. सकाळ 30/3/2015

## संक्षिप्त



नाशिक : विप्रोतर्फे झालेल्या कॅम्पस् इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेले विद्यार्थी.

# 'विप्रो'च्या कॅम्पस् इंटरव्ह्यूमध्ये 'क. का. वाघ'च्या नऊ जणांची निवड

नाशिक, ता. २९ : विप्रो टेक्नॉलॉजीतर्फे क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये नऊ विद्यार्थ्यांची निवड झाली. 'एमसीए'च्या विद्यार्थ्यांसाठी हा कॅम्पस इंटरव्ह्यू झाला. विप्रो कंपनीतर्फे संजीव बेतदूर यांनी महाविद्यालयाला भेट दिली. पहिल्या फेरीतून १८ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी निवड झाली. त्यातील १६ विद्यार्थी मुलाखतीसाठी निवडले गेले. निवड झालेल्या या मुलांपैकी नऊ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना दोन लाख वीस हजार इतके वर्षाचे पॅकेज देण्यात आले आहे. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी 'विप्रो'चे अधिकारी संजीव बेतदूर यांचे स्वागत केले.

दै. पुढारी 25/03/2015

# नऊ विद्यार्थ्यांना 'विप्रो'ने दिली संधी

## के. के. वाघ अभियांत्रिकीत कॅम्पस मुलाखत

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कंपनी 'विप्रो टेक्नोलॉजीस'च्या वतीने राबविण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीतून नऊ विद्यार्थ्यांची निवड केली असून, त्यांना वार्षिक दोन ते सव्वा दोन लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात चालू महिन्यात दुसऱ्यांदा कॅम्पस मुलाखत झाली. गेल्या आठवड्यात पुण्याच्या फिन आयक्यू कंपनीने २२ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी दिली. त्यानंतर आज (दि.२४) आंतरराष्ट्रीय कंपनी 'विप्रो टेक्नॉलॉजीस'तर्फे कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी कंपनीचे सीईओ शिरीष बेटदूर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही प्रक्रिया घेतली. प्रारंभी कंपनीच्या कामकाजाची, उत्पादनाचा व आंतरराष्ट्रीय पातळीवर कंपनीच्या नावलौकिकाची माहिती मुलाखतीसाठी आलेल्या उमेदवारांना देण्यात आली. या मुलाखतीसाठी सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सुरुवातीला उमेदवारांच्या ग्रुप मुलाखतीतून १६ विद्यार्थ्यांची टेक्निकल चाचणी व मुलाखतीसाठी निवड केली गेली. अखेरीस त्यातून सुमारे नऊ विद्यार्थ्यांना विप्रो कंपनीत नोकरी करण्याची संधी मिळाली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांच्या हस्ते निवड झालेल्या उमेदवारांना निवडपत्र देण्यात आले. यासाठी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. के. शहाबादकर यांनी परिश्रम घेतले.

दै. दिव्य मराठी 25/03/2015

संक्षिप्त वृत्त

# विप्रोतर्फे ४० विद्यार्थ्यांच्या कॅम्पस मुलाखती, १६ जण प्राथमिक फेरीत

नाशिक | के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात मंगळवारी झालेल्या कॅम्पस् इंटरव्ह्यूमध्ये उत्पादन निर्मिती क्षेत्रातील आघाडीची कंपनी विप्रोने एमसीएच्या ४० विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. सहभागी १६ विद्यार्थ्यांची प्राथमिक फेरीत निवड करण्यात आली. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर व प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शहाबादकर यांच्या मार्गदर्शनाखाली इंटरव्ह्यू झाल्या. शहरातील विविध एमसीए महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांची मुलाखत विप्रो कंपनीचे प्रमुख संजीव डेथडूर यांनी घेतली.